# रणजितसिंह देओल 'मेट्रो-३'च्या एमडीपदी रुजू

मुंबई, ता. २३ : कुलाबा- वांद्रे- सीप्झ हा मेट्रो- ३ प्रकल्प राबवणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालकपदी रणजितसिंह देओल गुरुवारी (ता. २३) रुजू झाले. देओल यांनी अश्विनी भिडे यांच्याकडून पदभार स्वीकारला. या वेळी दोघांनी एकमेकांना नवीन कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.

मेट्रो- ३ मार्गाद्वारे उपनगरी रेल्वेद्वारे जोडले न गेलेले महत्त्वाचे भाग जोडले जातील. त्यामुळे लोकल सेवेवरील ताण कमी होणार आहे. देओल यांच्याकडे वेगवेगळ्या पदांवरील कामाचा २० वर्षांहून अधिक अनुभव आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक व उपाध्यक्ष असताना अपघात टाळण्यासाठी त्यांनी बसगाड्यांच्या बांधणीत हलक्या स्टीलचा वापर करण्याची संकल्पना प्रत्यक्षात उतरवली. शिवशाही बस, स्मार्ट कार्ड, ई-टिकेटिंग व संवेदनशील स्थानकांमध्ये सीसी टीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात त्यांनी पुढाकार घेतला.